# रुपी को. ऑप. बँक लि., पुणे (अवसायनात)

मुख्य कचेरी - प्लॉट नं. बीसी-१, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७

मुख्यकचेरी : प्लॉट नं.बीसी-१, गेट नं.५, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे ४११ ०३७

फोन नं.०२०-२४२७०१४८/२४२७०५४८ ईमेल : board@rupeebank.com

## :: मयत ठेवीदारांच्या वारसांसाठी जाहीर आवाहन ::

रुपी को.ऑपरेटिव्ह बँक लि., पुणे दि.०१.११.२०२२ पासून अवसायनात आहे. ज्या ठेवीदारांनी ठेवी परत मिळणेसाठी क्लेम अर्ज दाखल केले होते त्यांना ठेव विमा महामंडळातर्फे ₹५.०० लाखांपर्यंतची विमासंरक्षित ठेव रक्कम अदा करणेत आली आहे. त्यानंतरही ज्या ठेवीदारांनी ठेव रक्कम परत मिळणेसाठी अर्ज केले नाहीत त्यांना दैनिक वृत्तपत्रातील निवेदनाद्वारे तसेच बँकेच्या संकेतस्थळावर जाहीर आवाहन करण्यात आले आहे. या ठेवीदारांमध्ये मयत ठेवीदार समाविष्ट आहेत.

सबब जे ठेवीदार मयत आहेत अशा ठेवीदारांच्या वारसांनी ₹५.०० लाखांपर्यंतच्या ठेवी परत मिळण्यासाठी अद्यापही अर्ज केले नसल्यास, विहीत नमूऩ्यात अर्ज सादर करावेत. अशा ठेवीदारांच्या वारसांनी मयत ठेवीदारांच्या बँकेत असलेल्या ठेवींच्या मूळ ठेव पावत्या / पासबुक, मयत ठेवीदारांच्या मृत्यु दाखल्याची प्रत व केवायसी इ. कागदपत्रांसह आपले खाते ज्या शाखेत आहे त्या शाखेत / मुख्यालयात त्वरित संपर्क साधावा. याबाबत बँकेतील अधिकारी सदरची ठेव रक्कम परत मिळणेसाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत आपणास मार्गदर्शन करतील त्याप्रमाणे आवश्यक ती सर्व पूर्तता करुन ज्या शाखेत ठेव रक्कम आहे त्याच शाखेत अर्ज सादर करावेत असे आवाहन बँकेतर्फे करण्यात येत आहे.

विहीत नमुन्यातील क्लेम फॅार्म www.rupeebank.com या वेब साईटवर उपलब्ध आहेत

स्थळ: पुणे

दिनांक : २९.१०.२०२५

सरव्यवस्थापक

रुपी को-ऑप.बँकलि.पुणे (अवसायनात)